**नियोजित कृष्णा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित ,चाळीसगांव जि.जळगांव या संस्थेचे नांव आरक्षित करण्याबाबत....**

व बँकेत खाते उघडण्याबाबत अर्ज :-

**प्रति,**

१) उपनिबंधक सहकारी संस्था ( शहर )

२) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,चाळीसगांव

विषय :- नियोजित कृष्णा फेस-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,चाळीसगांव जि.जळगांव. चे नाव आरक्षित करण्याबाबत व बँकेत खाते उघडण्याबाबत...

**महाशय,**

आपणांस मी कळवू इच्छितो की, माझी नियोजित कृष्णा फेस-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,चाळीसगांव जि.जळगांव संस्थेचा मुख्य प्रवर्तक म्हणून निवड करण्यात आली आहे. सावेत संस्था स्थापन करण्याच्या उद्देशाने घेण्यात सभेचा उतांत जोडला आहे. संस्थेची सभा दि.१४/२/२०२१ या सभेत मला संस्थेचा मुख्य प्रवर्तक म्हणून निवडण्यात आले व मला संस्था स्थापन करण्याच्या उद्देशाने मला लागणारी माहिती पुरविण्याचे व सह्या करण्याचे अधिकार अधिकार देण्यात आले आहे.

तसेच सभते समंत झालेल्या ठराव क्र.२ व मला दिलेल्या अधिकारीनुसार मी संस्था नोंदणी करण्याकरीता अर्ज सादर करीत आहे. व संस्थेचे नाव आरक्षित करण्याकरीता आवश्यक लागणारी माहिती खालीलप्रमाणे देत आहे. माझ्या माहितीप्रमाणे खालील माहिती बरोबर व योग्य आहे.

१) नियोजित संस्थेचे नांव :- नियोजित कृष्णा फेस-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव,जि.जळगांव.

२) संस्था नोंदणी करावयाचा पत्ता :- कृष्णा वर्ल्ड सि.टी.,डी.जी.नाना नगर चाळीसगांव,जि.जळगांव.

३) संस्थेत सहभागी झालेल्यांची संख्या : - १२

४) अर्जदार या वरील प्रवर्तकापैकी नियोजित संस्थेचा प्रवर्तक आहे काय :- होय

५) संस्थेचे दप्तर ज्या ठिकाणी राहणार आहे तो पत्ता :- डी. जी.नाना नगर चाळीसगांव जि.जळगांव.

६.) मुख्य प्रवर्तकाचे नाव , पत्ता व राहण्याचे ठिकाण :- श्री.महेश रमेश पाटील (बोरसे )

१) घराचा पत्ता --रो-हाऊस नं. २१ कृष्णा वर्ल्ड सि.टी.,डी.जी.नाना नगर,चाळीसगांव,जळगांव.

२) व्यवसाय व त्याचा पत्ता --

३) दुरध्वनी क्रमांक १) निवास --

७) वरील नाव आरक्षित होत नसल्यास पसंतीचे दुसरे नाव

१) नियोजित कृष्णानगरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,चाळीसगांव,जि.जळगांव.

२) नियोजित नवजीवन सहकारी गृनिर्माण संस्ता मर्यादित,चाळीसगांव,जि.जळगांव.

३) नियोजित महादेव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव,जि.जळगांव.

तरी आपणास विनंती की, वरील संस्थेचे नाव शक्य तितक्या लवकर आरक्षित करून संस्थेच्या नावांची जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा - चाळीसगांव खाते उघडण्यास परवानगी देण्यात यावी ही विनंती.

सहपत्र

१) सभेचा अहवाल

२) संस्थेची योजना

३) सभासद यादी

६/४/२०२१

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,चाळीसगांव
जि.जळगांव

आपला विश्वासू

**मुख्य प्रवर्तक**

नियोजित कृष्णा फेस-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,चाळीसगांव,जि.जळगांव.

# नियोजित कृष्णा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित ,चाळीसगांव जि.जळगांव सभा वृत्तांत

नियोजित कृष्णा फेस-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव जि.जळगांव स्थापन करण्याच्या उद्देशाने दिनांक १४/२/२०२१ आज ११:०० वाजता चाळीसगांव येथे सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत खालील व्यक्ती उपस्थित होते त्याची यादी सोबत जोडली आहे.

सभेत चर्चा झाली. त्यात प्रथम संस्थेचे नाव आरक्षित करुन मुख्य प्रवर्तकाकडे जमा झालेले भाग भांडल व प्रवेश फी ची रक्कम जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा चाळीसगांव येथे संस्थेच्या नावाने खाते उघडून ठेवण्याची परवनागी संबंधीत खात्याकडून घेण्यात यावी व त्याचा दाखला घेऊन संस्था सदरील सभेत खालील चर्चा करण्यात आली व ठराव संमत करण्यात आले.

विषय क्रमांक १ : सभेसाठी अध्यक्षांची निवड करणे.

ठराव क्रमांक १: आजच्या सभेचे कामकाज चालविण्याकरीता श्री. महेश रमेश पाटील ( बोरसे ) यांची निवड करण्यात आली व त्यांना सभेचे अध्यक्षस्थान स्विकारण्याची विनंती करण्यात आली.

ठराव सर्वांनुमते मंजुर

विषय क्रमांक २ : मुख्य प्रवर्तकाची निवड करणे व अधिकार देणे.

ठराव क्रमांक २ नियोजित संस्थेसाठी मुख्य प्रवर्तकाची निवहण करणेबाबत चर्चा करण्यात आली. संस्थेचे मुख्य प्रवर्तक म्हणून महेश रमेश पाटील ( बोरसे ) यांचे श्री. दादाभाऊ भिमराव वाघ व माधवराव भास्कर मगर यांनी सुचविले व त्यात श्री स्वरूपसिंग बळीराम पाटील यांनी अनुमोदने दिले. मुख्य प्रवर्तकासाठी दुसरे कोणतेही नाव न आल्याने श्री. महेश रमेश पाटील (बोरसे ) यांची मुख्य प्रवर्तक म्हणून निवड करण्यात आली. मुख्य प्रवर्तक म्हणून नियोजित संस्थेची नोंदणी करण्यासाठी आवश्यक ते भाग भांडवल व प्रवेश फी गोळा करणे नोंदणीसाठी आवश्यक खर्च करणे आदी अधिकार देण्यात आले.

ठराव सर्वांनमुते मंजुर

विषय क्रमांक : ३ संस्थेचे नाव व कार्यक्षेत्र ठरविण्याबाबत....

ठराव क्रमांक :३ संस्थेचे नाव व कार्यक्षेत्र ठरविण्याबाबत सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार संस्थेचे नियोजित कृष्णा फेस-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव,जि.जळगांव. असे ठेवावे व संस्थेचा पत्ता डी.जी.नाना नगर चाळीसगांव जि.जळगांव असा राहील. तसेच संस्थेचे कार्यक्षेत्र कृष्णा फेस-२सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव जि.जळगांव कृष्णा वर्ल्ड सि.टी.,डी.जी. नाना नगर चाळीसगांव पुरते मर्यादित राहील.

ठराव सर्वांनुमते मंजुर

विषयक क्रमांक :४ भाग भांडवल व प्रवेश फी किंमत ठरविणेबाबत...

ठराव क्रमांक : ४ संस्थेचे भाग भांडवल व प्रवेश फी रक्कम निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार सर्वसामान्य व्यक्तींना संस्थेचे सभासद होता याचे म्हणून संस्थेच्या प्रति भाग भांडवलाची किंमत रुपये ५००/- असावे व प्रवेश फी रुपये १०/- वर इतर खर्च रु. १००/- असावे. व सदरील रक्कम गोळा करण्याचे अधिकार संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री. महेश रमेश पाटील (बोरसे ) यांना देत आहे.

ठराव सर्वांनुमते मंजुर

विषय क्रमांक : ५ संस्थेच्या नावाने बँकेत खाते उघडणे व बँकींग व इतर आर्थिक व्यवहार करणे बाबत

ठराव क्रमांक : ५ विषयाच्या संदर्भात असे ठरविण्यात आले की, सहकारी खात्याकडून परवानगी घेऊन नियोजित संस्थेची भाग भांडवलाची व प्रवेश फीची रक्कम जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि- शाखा चाळीसगांव ठेवावी व व संस्थेला वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या रकमा धनादेश बँकेत ठेवावे सदरील खात्यात रकमा जाम करणे, काढणे व बँकींग व आर्थिक व्यवहार करण्याचा अधिकार नियोजित संस्थेच्या वतीने सदरील सभा संस्थेचे मुख्य प्रवर्तक महेश रमेश पाटील ( बोरसे )यांना प्रदान करीते, त्यांनी नियोजित संस्थेच्या वतीने आर्थिक व बँकींग व्यवहार करावेत.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक : ६ संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ठरविण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक : ६ सदरील सभेत संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ठरविण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला त्यानुसार नियोजित संस्थेचे अधिकृत भाग भांडवल प्रत्यकी रु. ५००/- प्रमाणे २ भागाचे रुपये १०००/- राहील. त्यास मंजुरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक : ७ नियोजित गृहनिर्माण सहकारी संस्थेकरीता प्लॉट खरेदीचे अधिकार देण्याबबात....

ठराव क्रमांक : ७ नियोजित गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांना प्लॉट वितरणासाठी जमीन खरेदी करणे आवश्यक आहे. नियोजित संस्थेत जमीन खरेदी अधिकार श्री. महेश रमेश पाटील ( बोरसे ) मुख्य प्रवर्तकांना देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक : ८ इतर तीन नावांची शिफारस करण्याबाबत...

ठरावी क्रमांक : ८ आजच्या सभेत सुचविण्यात आलेले संस्थेचे नाव आरक्षित होत नसल्यास आजची सभा क्रमाणे पुढील तीन नावांची शिफारस करत आहे.

१) नियोजित कृष्णानगरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव, जि. जळगांव.
२) नियोजित नवजीवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव, जि. जळगांव.
३) नियोजित महादेव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चाळीसगांव, जि. जळगांव.

विषय क्रमांक : ९ संस्थेचे उद्देश व उपविधी स्विकारण्याबाबत...
ठराव क्रमांक : ९ सभेत विषयांतर्गत चर्चा होऊन संस्थेच्या खालील उद्देशाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली त्याचप्रमाणे सभाध्यक्षांनी संस्थेचे उपविधी वाचुन दाखविले व त्यावर सांगोपांग चर्चा होऊन संस्थेकर नियोजित कृष्णानगरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित. चाळीसगांव, जि. जळगांव सहकारी संस्थेचे उपविधी स्विकारण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

१) नियोजित कृष्णानगरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव, जि. जळगांव.
२) नियोजित नवजीवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, चाळीसगांव, जि. जळगांव.
३) नियोजित महादेव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चाळीसगांव, जि. जळगांव.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक :१० नियोजित संस्थेची नोंदणी प्रकरणावर सर्व प्रवर्तकांच्या वतीने सह्या करण्याचे अधिकार मुख्य प्रवर्तकास देणेबाबत तसेच. त्यांच्या कामास मदत करण्याकरीता इतर दहा प्रवर्तकाची निवड करण्याबाबत....

ठराव क्रमांक १० नियोजित संस्थेचे नोंदणी प्रकरणाच्या चार प्रतीत तयार करून ते तावडतोब मा. उपनिबंधक सहकारीसंस्था ( शहर ) यांना मंजुरीकरीता सादर करण्यात यावे तसे नियोजित संस्थेच्या वतीने उपविधीचा व इतर महत्त्वाच्या कागदावर सह्या करण्याचे व इतर कामकाजास मुख्य प्रवर्तकास मदत करण्याचे खालील मुख्य प्रतर्वकासह अकरा प्रर्वतकांना अधिकार देण्यात आले.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. महेश रमेश पाटील ( बोरसे ) | - | अध्यक्ष | |
| २) | श्री. माधवराव भास्कर मगर | - | उप -अध्यक्ष | |
| ३) | श्री. शेखर उमरावगीर गोसावी | - | सचिव | |
| ४) | श्री. दादाभाऊ भिमराव वाघ | - | खजीनदार | |
| ५) | श्री. स्वरुपसिंग बळीराम पाटील | - | सदस्य | |
| ६) | श्री. धनराज भिमराव चौधरी | - | सदस्य | |
| ७) | श्री. प्रदिप रमेशराव साळुंखे | - | सदस्य | |
| ८) | श्री. नारायण सुखदेव मोरे | - | सदस्य | |
| ९) | श्री. योगेश महादु भामरे | - | सदस्य | |
| १०) | श्री. विनोद कृष्णाराव मेन | - | सदस्य | |
| ११) | श्री. सचिन मुकूंदराव अहिरे | - | सदस्य | |
| १२) | श्री. पुरुषोत्तम गोकुळ बोरणारे | - | सदस्य | |

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्रमांक : ११ अध्यक्षाचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषय .

सदरील विषयांच्या संदर्भात ऐनवेळी कोणताही विषय चर्चेस आला नाही. त्यामुळे आजची सभा सपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभा अध्यक्ष

मुख्य प्रवर्तक